Tuljaram Chaturchand College
Baramati

# राष्ट्रीय सेवा योजना

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व

# तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बारामती

# नियमित उपक्रम अहवाल २०२१–२२

डॉ. विलास कर्डिले
डॉ. चंद्रकांत कांबळे
डॉ. वैभव लांडगे

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना एकक वर्षभर क्रियाशील असते. प्रत्येक वर्षी स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट या दिवशी या उपक्रमाचे उद्‌घाटन होत असते. या वर्षी रविवार दि.१५ ऑगस्ट २०२१या दिवशी स्वातंत्र्यदिनी मा. श्री.चंद्रवर्धन शहा (मुबंईकर) सदस्य , अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती यांनी २०२१–२२ या शैक्षणिक वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित उपक्रमाचे उद्‌घाटन केले. या प्रसंगी संस्थेचे पदाधिकारी मा.प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य, प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक कार्यक्रम अधिकारी आदी उपस्थित होते.

ध्वजवंदनानंतर कोविड आप्पती आचार संहिते नुसार दृश्यप्रणाली द्वारे आयोजित कार्यक्रमामध्ये मा.प्राचार्य चंद्रशेखर मुरुमकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. त्यांनी आजची युवा पिढी त्यांच्यापुढील आव्हाने आणि समाजातील बदलाचे परिणाम यावर भर दिला. व कोविड आपत्ती निर्मूलन कार्यासाठी कार्यशील राहाण्याचा संदेश दिला.

१) **वृक्षरोपण** – दि.७ ऑगस्ट हरितक्रांती या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी नियमित उपक्रमांतर्गत सुरुवात ही जीमखाना व खेळाचे मैदान येथील परिसरामध्ये एकूण १०० विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. यामध्ये स्वयंसेवकांनी उत्फुर्तपने सहभाग नोंदविला.

२) **यिन इलेक्शन** – प्रत्येक वर्षी विविध महाविद्यालयातून यिन इलेक्शन या द्वारे विद्यार्थी प्रतिनिधीची निवड केली जाते. आपल्या महाविद्यालयातून २०२१–२२ यावर्षी प्रीतम गुळमकर या विद्यार्थ्यांची यिन प्रतिनिधी म्हणून निवड झाली आहे.

३) **पोलिस मित्र** – बारामती शहरामध्ये कोविड आपत्ती निर्मूलन कार्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील एकूण ३० स्वयंसेवक पोलिसांच्या मदतीने पोलिस मित्र म्हणून यामध्ये स्वयंसेवकांनी उत्फुर्तपने सहभाग नोंदविला.

४) **पथनाटय** –_राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी वेगवेगळया सामाजिक विषयावर बारामती परिसरामध्ये पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती केली. यामध्ये कोविड आपत्ती निर्मूलन, माझा गाव कोरोना मुक्त गांव, स्वच्छ बारामती, व्यसनमुक्ती, इत्यादी वेगवेगळया विषयांमध्ये सहभागी होवून बक्षीसे मिळविली. यामध्ये

१) प्रीतम गुळमकर व गृप – पथनाट्य प्रथम क्रमांक (बारामती नगरपरिषद)

२) आदित्य कोथमिरे व गृप – पथनाट्य दितीय क्रमांक (डोर्लेवाडी, शिवजयंती मोहत्सव २०२२)

५) **हिवाळी शिबीर** – दि.१६ ते २२ जानेवारी २०२२ या कालावधीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबीर मौजे अनजंगाव ता.बारामती येथे संपन्न झाले. महाविद्यालयाचे हे दत्तक गाव असून या गावामध्ये गेली दोन वर्षे हे शिबीर राबविले जाते. या शिबीरामध्ये विविध व्याख्याने, चर्चासत्रे, भारुड, पथनाटय, भजन, सांस्कृतीक कार्यक्रम व श्रमदान, जनजागृती आदी उपक्रम घेण्यात आले. श्रमदानामध्ये अनजंगाव परिसरामध्ये एकूण ६६० झाडे लावण्यात आली. तसेच वृक्षांना आळी करण्यात आली. अनजंगाव येथील शाळा येथे बाग करण्यात आली. तसेच रस्त्यांच्या दुतर्फा व प्राथमिक आरोग्यकेंद्र तसेच गावठान येथे झाडे लावण्यात आली. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले . अनजंगाव येथील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ तसेच जिल्हा समन्वयक डॉ. विलास कर्डिले, कार्यक्रम अधिकारी डॉ. वैभव

Tuljaram Chaturchand College Baramati

लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कमिटी सदस्य यांच्या सहकार्यामुळे हे शिबीर यशस्वीपने पार पडले.

६) **Can I Help You** – शैक्षणिक वर्षे २०२१–२२ मध्ये महाविद्यालयात होणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक Can I Help ल्वन या बॅनरखाली तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित राहून उत्स्फुर्तपने काम करताना दिसतात. महाविद्यालयातील, ऑल इंडिया कॉर्फ बॉल असोसिएशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजीत राष्ट्रीय '' बेस बॉल,क्रॉफ बॉल '' स्पर्धा अनुक्रमे दि. १४ ते १९ जानेवारी २०२२ व दि. २१ ते २४ जानेवारी २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धा मध्ये आलेल्या खेळाडूंच्या निवास ,भोजन व इतर कमिटी मध्ये ५० स्वयंसेवकांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला.

७) **श्रमदान** – श्रमदान हे राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये श्रेष्ठ मानले जाते. श्रमदानाच्या माध्यमातून नियमित उपक्रमांतर्गत कला, विज्ञान व वाणिज्य, बी.व्होक जर्नालिझम विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सुट्टी सोडून श्रमदान केले. कला व वाणिज्य शाखा प्रत्येक गुरुवारी दुपारी १२ ते २ तसेच विज्ञान, बी.व्होक जर्नालिझम सकाळी ८ ते १० या वेळेत श्रमदान केले. यामध्ये १) महाविद्यालयाच्या परिसराची स्वच्छता राखने

२) महाविद्यालयाच्या जिमखाना विभाग परिसर स्वच्छता करणे

३) महाविद्यालयामध्ये वृक्षारोपन करणे

४) महाविद्यालयातील विविध उपक्रमामध्ये स्वयंसेवक म्हणून सहभागी होवून शिस्तीचे पालन करणे इत्यादी कामे करण्यात आली.

८) **मतदार जनजागृती** – दि.२५ जानेवारी हा दिवस मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी कोविड आप्पती आचार संहिते नुसार दृश्यप्रणाली द्वारे मतदार जनजागृती मोहिम राबविण्यात आली..

Tuljaram Chaturchand College Baramati

९) **माझी वसुंधरा २०२२** – महाराष्ट्र शासन आयोजित माझी वसुंधरा या अभियाना अंतर्गत दि १५–३० ऑगस्ट २०२२ या कालावधीत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभगातील स्वयंसेवकांनी पर्यावरण सवर्धन शपथ ,वृक्ष संवर्धन जिओ टॅग छायाचित्रासह माहिती महाराष्ट्र शासन निर्गमित वेबपोर्टलवर भरण्याच्या उपक्रमात उस्फुर्त सहभाग नोंदवला.

१०) **पल्स पोलिओ –** दि.३१ जानेवारी व ११ फेब्रुवारी २०१८ रोजी महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या पल्स पोलिओ साठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विविध बूथवरती जावून सहकार्य केले. शिस्त व प्रत्येक घरी जावून पल्स पोलिओ संदर्भात जनजागृती केली. यामध्ये २० स्वयंसेवकांनी भाग घेतला. यासाठी स्वयंसेवकांना कार्यक्रम अधिकारी यांनी मार्गदर्शन केले.

११) **कोविड प्रदुर्भाव तपासणी अभियान–** महाराष्ट्र शासनातर्फे महाविद्यालयामध्ये बारामती पंचायत समिती, बारामती राष्ट्रीय सेवा योजना, बारामती नगरपरिषदयांच्या संयुक्त विद्यमाने कोविड प्रदुर्भाव तपासणी अभियान दि.२३–३१. जानेवारी २०२२ आयोजित करण्यात आले होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेतील या अभियानात ३०० स्वयंसेवकांसह महाविद्यालयातील १२७ विदयार्थ्यांनी यशस्वीपने सहभाग नोंदविला.

१२) **कोविड निर्मुलन लसिकिरण अभियान–** महाराष्ट्र शासनातर्फे महाविद्यालयामध्ये बारामती पंचायत समिती, बारामती राष्ट्रीय सेवा योजना, बारामती नगरपरिषदयांच्या संयुक्त विद्यमाने कोविड प्रदुर्भाव तपासणी अभियान दि.२७–३१/१०/२०२२ आयोजित करण्यात आले होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेतील या अभियानात महाविद्यालयातील ९८३ विदयार्थ्यांनी यशस्वीपने सहभाग नोंदविला.

Tuljaram Chaturchand College Baramati

**१३) माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत वृक्षगणना अभियान २०२२ –** बारामती शहरामध्ये माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत वृक्षगणना अभियान २०२२ बारामती नगरपरिषद तसेच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेना , वनस्पती शास्त्र विभाग, पर्यावरण शास्त्र विभाग संयुक्त विद्यमाने ही मोहिम राबविण्यात आली. यावेळी स्वयंसेवकांनी बारामती परिसरामध्ये १९७१७ वृक्षांची, १२३६१ रोपांची, जिओ टॅग छायाचित्रासह माहिती संकलित करून, हरित बारामती उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने पुढील पाच वर्षासाठी लागवड करण्यासाठी आवश्यक असणारी वृक्ष संख्या अधोरेखित केली. गोळा करुन नगरपालिकेला मोठे सहकार्य केले. तसेच महाविद्यालय परिसरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्लॅस्टीक तुकडे जमा केले. स्वयंसेवकांनी प्लॅस्टीक पिशव्या तसेच छोटे प्लॅस्टीक तुकडे जमा केले. स्वयंसेवकांनी प्लॅस्टीक चा वापर टाळा व पर्यावरणाची रक्षा करा असा प्रचार देखील केला. स्वयंसेवकांनी हा उपक्रम स्वयंस्फुर्तीने राबविण्यात आला होता. महाविद्यालयाच्या मा.प्राचार्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

**१४) विदयापीठ स्तरीय युवक युवती उन्नयनीकरण कार्यक्रम व प्रशिक्षण कार्यशाळा –** दि. २१–२३/०३/२०२२या दिवशी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व तुळजाराम चतुरचंद महाविद्याल राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने विदयापीठ स्तरीय युवक युवती उन्नयनीकरण कार्यक्रम व प्रशिक्षण कार्यशाळा

आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे विदयापीठ स्तरीय युवक युवती उन्नयनीकरण कार्यक्रम व प्रशिक्षण कार्यशाळा '' जनजागृतीचे पारंपरिक माध्यम व प्रक्षिशण'' कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. डॉ जगदीश देशपांडे यांच्या हस्ते झाले. ही प्रशिक्षण कार्यशाळा एकूण तीन दिवसांची होती. या व्याख्यानमालेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर हे होते तर स्वागत व प्रास्ताविक हे प्रशिक्षण कार्यशाळा समन्वयक प्रा.डॉ. विलास कर्डीले यांनी केले. कार्यशाळेच्या पहिल्या दिवषी पहिल्या सत्रात श्री.अनिल केंगार यांनी लोक कलेतून सामाज प्रभोधन ,दुसऱ्या सत्रात सौ.अनिता जाधव यांनी फॅक्ट शाळा या विषयावर प्रभोधन केले तर दुसऱ्या दिवशी श्री. सोमनाथ कदम यांनी काव्यातून जनजागृती व श्री रितेश पाटील यांनी

**पथनाट्यतून जणजागृती या विषयावर प्रभोधन व प्रशिक्षण दिले आणि तिसऱ्या दिवषी श्री. शेखर** भाकरे यांनी भारुडातून जणजागृती या विषयाव प्रभोधन व प्रशिक्षण दिले .यावेळी विविध महाविद्यालयातून या कार्यशाळेस १०० स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुत्रसंचालन स्वयंसेविका कु शर्मिला देवकाते, श्रुती माने यांनी केले तर आभार डॉ. चंद्रकांत कांबळे , डॉ.संदीप तापकीर आणि प्रा .अस्मिता भगत मानले. या ० कार्यशाळेचेच्या यषस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना समिती तील सर्व सहयोगी कार्यक्रम अधिकारी व सदस्यांनी खुप परिश्रम घेऊन योग्य नियोजन व व्यवस्थापन केले.

**१५) युवक युवती उन्नयनीकरण अंतर्गत लिंगभाव संवेदीकरण व समता कार्यशाळा –** युवक युवती उन्नयनीकरण अंतर्गत लिंगभाव संवेदीकरण व समता या विषयवार राष्ट्रीय सेवा योजना , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ , तुळजाराम चतुर्चंद महाविद्यालय ,बारामती व महर्षी कर्वे बाया स्त्री अभ्यासिका केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्दमाणे दृश्य प्रणालीलावर दि २६/११/२०२१ रोजी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी प्रमुख व्याख्याता सौ. रश्मी पटवर्धन ,महर्षी कर्वे बाया स्त्री अभ्यासिका केंद्र, पुणे ह्या लाभल्या होत्या. सौ. रश्मी पटवर्धन यांनी स्त्री पुरुष समानता, पूरकता, विषमता या विषयावर स्वयंसेवकांत मार्गदर्शन करीत, स्वयंसेवकांचे विविध शंकांचे निरसन केले. सदर कार्यशाळेत १६७ सवयंसेवकांनी सहभाग नोंदवला. कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा.डॉ. विलास कर्डीले यांनी केले.सूत्रसंचालन सुत्रसंचालन स्वयंसेविका कु शर्मिला देवकाते, श्रुती माने यांनी केले तर आभार प्रा .अस्मिता भगत मानले.

**१६) आजादी का अमृतमोहत्सव या उपक्रमा अंतर्गत एक सूर एक ताल प्रशिक्षण कार्यशाळा –** युवा बिरादरी ,मुंबई व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग ,सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृतमोहत्सव या उपक्रमा अंतर्गत एक सूर एक ताल प्रशिक्षण कार्यशाळा दि १५ मार्च २०२२ रोजी आयोजित करण्यात आली. या कार्यशाळे श्री प्रशांत व त्यांचा वाद्यवृंद संघाने सहभागी स्वयंसेवकांना विविध राष्ट्रीय एकात्मता या विषयावर विविध

भाषेतील गाणे व त्यातील एक ताल या विषयावर प्रशिक्षण व प्रात्यक्षिक करून प्रभोदन केले. या कार्यशाळेत ४६७ स्ववसेवक व विध्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यशाळेंचे प्रास्ताविक डॉ. विलास कर्डीले यांनी केले तर आभार प्रा. भीमराव तोरणे यांनी मानले

**महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांचा विविध ठिकाणी असलेला सहभाग खालीलप्रमाणे**

| अ. क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | रोल नंबर | शिबराचे नाव | ठिकाण | तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आदित्य कोथमिरे<br>वैभवी शेळके | तृतीय वर्ष शास्त्र | ७५०४<br>७४५६ | Pre-SRD selection camp | (Morden college) | १७/०९/२०२१ |
| २ | आदित्य कोथमिरे | तृतीय वर्ष शास्त्र | ७५०४ | Pre-SRD selection camp | SPPU | २२/०९/२०२१ |
| ३ | आदित्य कोथमिरे<br>वैभवी शेळके | तृतीय वर्ष शास्त्र | ७५०४<br>७४५६ | लिंगभाव संवेदना व समता | SPPU | |
| ४ | आदित्य कोथमिरे | तृतीय वर्ष शास्त्र | ७५०४ | NYF | Pondwchari Online | १२–१६/०१/२०२२ |
| ५ | आदित्य मोरे | द्वितीय वर्ष शास्त्र | ७०४२ | Human Right workshop | Online | ०१/०२/२०२१२ |
| ६ | अजय रासकर<br>गिरीश जाधव<br>वैभवी शेळके | तृतीय वर्ष कला | ११३६६<br>६७०२<br>७४५६ | साहसी शिबिर (DPU and SPPU) | रंतनवाडी, अकोला | १–५/०३/२०२२ |
| ७ | प्रतीक्षा राऊत<br>श्रुती माने | तृतीय वर्ष वाणिज्य | १०५९७<br>१०६३८ | लिंगभाव संवेदना व समता | SPPU | ०३/०३/२०२२ |
| ८ | श्रुती माने<br>शर्मिला देवकात<br>अभिषेक फाळके<br>प्रसाद गावडे | तृतीय वर्ष शास्त्र वाणिज्य कला | १०६३८<br>११२९२<br>८२३३<br>७२९९ | लिंगभाव संवेदना व समता | SPPU | २४–२५/०३/२०२२ |

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

Tuljaram Chaturchand College Baramati

## नियमित उपक्रमाचे छायाचित्र

नियमित उपक्रम (स्वच्छता पंधरवडा, संविधान रॅली, माझी वसुंधरा अभियान)







कोविड निर्मुलन लसीकरण मोहिम







सकाळ

टी.सी. महाविद्यालयात मोफत लसीकरण शिबिर

माझी वसुंधरा अभियान, बारामती शहर (वृक्षगणना अभियान)






कोविड प्रार्धुरभाव तपासणी शिबीर

पल्सपोलिओ लसीकरण अभियान




Tuljaram Chaturchand College Baramati

## नियमित उपक्रमाचे छायाचित्र

पथनाटयातून जनजागृति स्पर्धेतील पुरस्कार





युवा बिरादरी यांच्या संयुक्त विद्यमाने एक सुर एक ताल एक दिवसीय कार्यशाळा





राष्ट्रीय कॉर्फबॉल व बेसबॉल स्पर्धेतील स्वयंसेवकांच्या समवेत मा.कुलगुरू डॉ. नितीन करमळकर व प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व डॉ.दिपक माने

